मातृदेवतांचा ऐतिहासिक अभ्यास : विशेष संदर्भ कोल्हापूर जिल्हा

(Historical Study of the Mother Goddesses : With Special Reference Kolhapur District)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

पीएच. डी. (इतिहास) पदवीसाठी शोधप्रबंधाचा गोषवारा इतिहास विभागामार्फत सादर

संशोधक

प्रा. श्री. रामचंद्र गुर्लिंग घुले

M. A., B. Ed., SET

मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

ता. वाळवा, जि. सांगली (महाराष्ट्र)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. गंगथडे रमेश दत्तात्रय

M. A., M. Phil., Ph. D.

इतिहास विभाग प्रमुख

कर्मवीर तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती

ता. अहमदपूर, जि. लातूर – ४१३ ५१४

सन : २०१६

अनुक्रमणिका

अ. नं.	तपशील	पृष्ठ क्रमांक
१	प्रस्तावना	१ ते ५
२	विषय निवडीचे महत्त्व	५ ते ६
३	संशोधनाची उद्दिष्टे	६ ते ७
४	गृहितके	७
५	संशोधन पद्धती	७ ते ८
६	प्रकरणनिहाय आराखडा १) कोल्हापूर जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी २) मातृदेवतांचा उगम व स्वरूप ३) कोल्हापूर जिल्ह्यातील मातृदेवता ४) कोल्हापूर जिल्ह्यातील मातृदेवता मंदिराच्या ग्रामयात्रा ५) अंधश्रद्धा आणि प्रबोधन चळवळी ६) निष्कर्ष	८ ते ९
७	संदर्भ साधने	१०

मातृदेवतांचा ऐतिहासिक अभ्यास : विशेष संदर्भ कोल्हापूर जिल्हा

(Historical Study of the Mother Goddesses : With Special Reference Kolhapur District)

१) प्रस्तावना (Introduction) :-

'मा' म्हणजे अन्न मोजून देणारी व 'देवता' म्हणजे स्त्री दैवत होय. सजीव विश्वाच्या अवकाशकल्प जीवन व्यवहारात जिच्याकडे जनन, भरण व पोषण ही जबाबदारी निसर्गाने 'स्त्री', 'मादी' व 'पुकेशी' या भाषा व्यवहारातील स्त्रीलिंगी पुनरूत्पादक शक्तीकडे सोपविले तिलाच माता हे नामाभिधान मानवाने दिले. जनन, भरण, पोषणाची अद्भूत शक्ती निसर्गाने स्त्रीलाच दिली म्हणून आदिम मानवी समूहांनी तिला देवता ठरविले. जी शक्ती अर्भकाला जन्म देते तीच शक्ती भूमीतून नवा अंकुर निर्माण करते. या निरीक्षणातून आदिम मानवी समूहाने भूमी व स्त्रीला वंद्य व एकरूप मानले. स्त्री व भूमी तसेच मानवी जीवनाची अशाश्वतता यांच्यातील विचारविमर्शातून यातुप्रधान धर्म निर्माण झाला. यातूनच दैवतपूजनाच्या इतिहासात सर्वात प्राचीन प्रथा सुरू झाली, मातृपूजनाची. आद्य समूह जीवन जगणाऱ्या मानवाने मातृप्रधान व कृषीजीवी संस्कृती निर्माण केली. त्यांनी देवता का निर्माण केल्या? याची पुरातत्वशास्त्रीय व धर्मशास्त्रीय मांडणी इतिहास विषयाच्या परिप्रेक्षातून प्रागैतिहास ते आधुनिक काळ करणे अधिक महत्त्वपूर्ण ठरते. जगभरातील सर्वच प्राचीन संस्कृत्यांमध्ये मातृदेवतांची पूजा केली जात होती. भारतीय संस्कृती ही मातृसत्ताक कृषीजीवी अर्थरचनेची असून मातृदेवता, कृषीउत्पादन प्रकिया व निसर्गचक्र यांच्यातील अनन्य संबंधावरच नवसमाज संस्कृतीची निर्मिती होते. अशा संस्कृत्यांच्या प्रवाही संमिलीकरणाच्या कोटीक्रमात मातृदेवतांचे मूळ स्वरूप विस्तारत जाऊन कृषीदेवता, जलदेवता, ग्रामरक्षक देवता, रोगराईच्या देवता व गृहदेवता असे नानाविध स्वरूप-प्रकार निर्माण झाले. मातृसत्ताक समाजव्यवस्थेतून मातृदेवतांचा उगम होत गेला. मेसापोटेमिया, प्राचीन सिरिया, बॅबिलोनिया, प्राचीन ग्रीक, असेरियन व सुमेरियन या संस्कृत्या मातृसत्ताक होत्या. मातृदेवतांची उपासना संपद्राय इजिप्त, सिरिया व मेसोपोटेमिया या मध्य आशियातील संस्कृत्यांमधून भारतात आला असावा. ग्रीक संस्कृतीमधील व्हिनस देवता, इजिप्शीयन हेकेट, अरबदेवता अल्-उज्जा, मेसोपोटिमयन देवता इनान्ना, ग्रीक देवता आर्टेमिस, रोमन देवता बैबो अशा अनेक मातृदेवतांची उपासना पश्चिम आशियातील प्राचीन संस्कृत्यांमध्ये केली जात होती. तेथून मातृदेवतांची उपासना मेसोपोटेमिया, असेरियन, अकेमेडियन, बॅबिलोनियन, अनातोलिया व

इजिप्शीयन संस्कृत्यांमधून प्रवास करीत सिंधूपूर्व मेहेरगढ संस्कृतीमध्ये येऊन पोहोचली. तेथून ती सिंधू संस्कृती व प्राचीन भारतात प्रवास करीत येऊन पोहोचली.

प्राचीन भारतीय संस्कृती मातृसत्ताक कृषीजीवी संस्कृती होती. प्राचीन गणसमाज मातृ–स्त्रीसत्ताक असून त्यातच मातृदेवतांच्या उदयाचे सुद्धा मूळ लपलेले आहे. स्त्रीजन हे कृषक असल्याने मातृदेवता प्रधान होते. कृषीविधीचा मातृ–स्त्रीसत्ताकतेत स्त्रियांशी घनिष्ठ संबंध दिसतो. स्त्रीसत्ताक कुलाचा शेतीशी व कृषीमायाविधीशी अविभाज्य संबंध होता. कुलांच्या कुलमुख्या वा गणमाता परंपरेतच मातृदेवतांचे मूळ लपलेले आहे. मातृदेवता शब्दातील ‘देवता’ ही निव्वळ कल्पना नसून मातृसत्ताक समाजपद्धतीतील स्त्रीयांच्या मातृत्वाचे जीवो–भौतिक वास्तव आहे. तिचे स्थलांतरण कुलमुख्या वा गणमातेकडून देवत्वाकडे झाले आहे. म्हणजेच मातृसत्ताकतेतील गणमाता वा कुलमुख्याचे दैवतीकरण झाले असावे. या सर्व इतिहासक्रमाचा शोध प्रस्तुत संशोधन विषयामध्ये संशोधकाला घ्यायचा आहे.

‘कृषीमाया विधी’ हा स्त्रीसत्ताकतेत स्त्रियांना मुक्त, अनियंत्रित लैंगिक कामाचाराची परवानगी व हक्क बहाल करीत असे आणि त्यातच जमिनीच्या सुपीकतेची हमी असे. स्त्रीचा रजोधर्म वा ऋतूदर्शन भूमीशी साधर्म्य साधते. मानवाच्या या हजारो वर्षांच्या निरीक्षणातून कृषीचा वार्षिक हंगाम प्रसवल्यावर भूमातेच्या शुद्धीकरणाचा उत्सव केला जाऊ लागला. गावोगावच्या देवतांच्या यात्रा, सण–उत्सव, व्रत–वैकल्ये अशा आकृतीबंधाच्या परिपोषणातूनच निर्माण होत गेली. नवाश्मयुगात शेतीचा शोध स्त्रियांनी लावल्यानंतर मातृसत्ता–स्त्रीसत्ता दृढ होत जाऊन कृषीमाया विधी स्त्रियांकडे आला. आद्यधर्माची आणि राज्यव्यवस्थेची पाळेमुळे या काळात दिसून येतात.

शेती हे स्त्रीचे क्षेत्र मानले जाऊ लागले. पुरुष शिकार, मासेमारी व संरक्षण तर स्त्रिया शेती व प्रजोत्पादन अशी काहीशी नैसर्गिकरित्या येणारी श्रमविभागणी तयार झाली. स्त्रियांकडील प्रजनन व भूमीची उत्पादन क्षमता यातील साधर्म्य आदिमानवाने पाहिले. 'A fruitful women makes plant fruitful', हे तत्त्व त्याच्या मनोभावात रूजले. पुरुषांकडून होणारे अन्न संकलन कष्टप्रद व अनिश्चित होते तर स्त्रियांचे कृषीकर्म कमी कष्टप्रद व शाश्वत अन्न उत्पादन देणारे परंतु दीर्घकाळ चालणारे होते. त्यामुळे कृषीकर्मात यातुविधी (जादूटोणा) या आद्यविज्ञानाचा उदय झाला. फ्रेजर यास 'Psydo-Science' असे म्हणतो.

महाराष्ट्र राज्याच्या अगदी दक्षिणेकडील जिल्हा म्हणजे कोल्हापूर होय. कोल्हापूर जिल्हा म्हणजे मातृदेवतांचा देव्हाराच होय. संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मातृदेवतांचे पूजन मोठ्या प्रमाणात आजच्या २१ व्या शतकातही केले जात आहे. या मातृदेवतांचे पूजन अनेकविध

मुर्त्या, आकारहीन शिळा व तांदळाच्या स्वरूपात केले जात आहे. घरात, दारा–पारावर, ओढ्यावर, शेताच्या बांधावर, डोंगरकपारीतील जंगलाच्या राईत अशा मातृदेवतांच्या मूर्त्या–तांदळा शतकानुशतके ठाण मांडून बसल्या आहेत. या मातृदेवता आसराई, जोखाई, जुगाई, मेसाई, यमाई, बोरजाई, खामजाई, मांजराई, मरी, महि, पवनाई, निनाई, वाघजाई व सातीआसरा अशा अनेकविध नावांनी ओळखल्या जातात. त्यांची पूजा–अर्चा, यात्रा–उत्सव मोठ्या भक्तीभावाने खेडोपाडी केल्या जात आहेत. या मातृदेवतांनी ग्रामीण जीवनाचे अंग व्यापून टाकले आहे. त्यांच्या अनेक दैवतकथा, मिथके रूढ आहेत. त्यांच्याविषयी समाजात मोठ्या अंधश्रद्धा बाळगल्या जाऊन कर्मकांडही केले जात आहे. पशूबळी, भाकणूक, गावपाळक, गाऱ्हाणे, चेटूक, भानामती व करणी इ. स्वरूपात अंधश्रद्धात्मक उपचार केले जात आहेत. या मातृदेवतांच्या परिसरात सूक्ष्मास्त्रे, कुंभ, पुष्कर, शिलावर्तुळे, कांदळ, सतीशिळा व शिलालेख आढळून येतात.

अशा मातृदेवतांच्या अभ्यास कोल्हापूर जिल्ह्याच्या संदर्भात करताना त्याचे जागतिक संदर्भ विचारात घेतले जाणार आहेत. $15^{0}43'$ उत्तर ते $17^{0}10'$ उत्तर आणि $43^{0}40'$ पूर्व ते $74^{0}42'$ पूर्व या दरम्यान असणाऱ्या या जिल्ह्याचे ८,१३५ चौ. किमी. इतके आहे. महाराष्ट्राच्या २.६% क्षेत्रफळ असणाऱ्या या जिल्ह्यात शाहूवाडी, पन्हाळा, करवीर, हातकणंगले, शिरोळ, गगनबावडा, राधानगरी, भुदरगड, कागल, आजरा, गडहिंग्लज व चंदगड असे १२ तालुके आहेत. या जिल्ह्याला इतिहासाचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. सामान्यतः प्रागैतिहासिक काळ ते इ. स. १३४७, इ. स. १३४७ ते १७०० व इ. स. १७०० ते १८१८ असे इतिहासाचे तीन मुख्य कालखंड येथे पडतात. प्राचीन रोमशी कोल्हापूरचे व्यापारी संबंध होते, हे ब्रह्मपुरीच्या उत्खननात सापडलेल्या 'पोसायडोन'च्या मूर्तीवरून कळून येते. इ. स. १०–१२ व्या शतकात कोल्हापूर ही शिलाहार राजवटीची राजधानी होती. महाराणी ताराबाईने कोल्हापूरला मराठ्यांची स्वतंत्र गादी स्थापन केली. कोल्हापूरची स्वतंत्र अशा धाटणीची 'कोल्हापूरी' संस्कृती असून सिन्धुवक्त्र मातृसत्ताक कृषीसंस्कृती येथे प्राचीन 'कुर' राजवटीपासून नांदत होती. त्यामुळे आदिमकाळापासून येथे मातृपूजन केले जात होते. 'करवीर महात्म्य' या संस्कृत ग्रंथात कोल्हापूरचा उल्लेख 'कोल्लाक्षेत्र' व 'मातृकेचे आद्यपीठ' असा आला आहे. महानुभावांच्या 'लीळाचरित्र'तील त्याग प्रकरणात कोल्हापूरचा उल्लेख 'मातापूर' असा आहे. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठापैकी एक 'महालक्ष्मी' मातृदेवता हे एक गाजते–जागते शक्तीपीठ येथे आहे. कोल्हापूर शहराच्या पंचगंगा नदीकिनारी ब्रह्मपुरी येथे झालेल्या उत्खननात मातृदेवतांच्या मुर्त्या सापडल्या असून त्या सातवाहनकालीन होत.

संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मातृदेवतांची प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक काळतील मंदिर–ठिकाणे सापडतात. ती पुढीलप्रमाणे –

अ. नं.	तालुका	गाव	मातृदेवता
१)	करवीर	कोल्हापूर	महालक्ष्मी
२)	करवीर	बालिंगे	कात्यायनी देवी
३)	राधानगरी	चक्रेश्वरवाडी	सप्तमातृका (शिलावर्तुळे)
४)	राधानगरी	आमजाई व्हरवडे	आमजाई
५)	पन्हाळा	मसाई पठार	मसाईदेवी (गुंफा)
६)	गडहिंग्लज	गडहिंग्लज	महालक्ष्मी
७)	हातकणंगले	आळते	रेणुकादेवी
८)	आजरा	उत्तूर	जोमकाई
९)	भुदरगड	निष्णप	लक्ष्मीदेवी
१०)	गगनबावडा	बोरबेट	मोरजाई
११)	चंदगड	कोदाळी	माऊली
१२)	हातकणंगले	हुपरी	अंबाबाई
१३)	शाहूवाडी	यळवण	जुगाई
१४)	शिरोळ	हेरवाड	संतुबाई

याबरोबरच कोल्हापूर शहरातील मातृदेवता–अष्टदुर्गा म्हणजे श्री एकांबिका, श्री मुक्तांबिका, श्री पद्मावतीदेवी, श्री प्रियांगी, श्री कमलांबा, श्री महाकाली देवी, श्री अनुगामिनी देवी, श्री गजांतलक्ष्मी या आदिशक्तीच्या स्वरूपात पुजल्या जात आहेत. याबरोबरच जिल्ह्यातील प्रत्येक खेड्यात ग्रामदेवतेच्या स्वरूपातही मातृदेवतांचे पूजन केले जात आहे. अशा मातृदेवतांच्या उगम व स्वरूपाचे भौतिक आकलन व वास्तव स्वरूप समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. काळाच्या ओघात त्यांचे वास्तव स्वरूप विसरले जाऊन

त्यांच्याविषयी भितीयुक्त वातावरण ग्रामीण जीवनामध्ये आढळते. ग्रामीण समाजमनावर त्यांची घट्ट पकड असून त्याचे अनेक इष्ट-अनिष्ट परिणाम दिसून येत आहेत.

२) विषयनिवडीचे महत्त्व (Selection of the Topic) :-

भारतासहित जगातील सर्वच प्राचीन संस्कृत्यांमध्ये मातृपूजनाचा आदिबंध दिसून येतो. एका संस्कृतीने दुसऱ्या संस्कृतीमधील मातृदेवतांचा स्वीकार केल्याचे दिसून येते. मातृपूजन कृषीप्रधान भौतिक संस्कृती, मातृसत्ताक समाज व्यवस्था, कृषीमायाविधी या संदर्भात अनेक संस्कृत्यांमध्ये समानता दिसून येते. यातूनच वैश्विक एकात्मता साध्य करण्यास मोठी मदत होणार आहे. आद्य टोळीप्रधान मातृसत्ताक समाज भौतिकवादी असून त्यांच्यामध्ये संपत्तीची समानमालकी, लैंगिक साम्यवाद, स्वातंत्र्य व गणराज्यात्मक शासनप्रणाली असून त्याचा 'आदर्श' भारतीय लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी होऊ शकतो.

मातृसत्ताकतेतील गणमाता वा कुलमुख्याच्या मृत्योत्तर दैवतीकरण होऊन त्यांना मातृदेवता बनवून त्याच्याभोवती मंदिर-पूजा-विधीचे प्राकवच् कसे बनत गेले याचा शोध सदरच्या अभ्यासातून सापडू शकेल. आजच्या पुरुषसत्ताक वर्ण-लिंग वर्चस्ववादी प्रवृत्तीवर समता-न्यायवादी उपाययोजना सदरच्या अभ्यासातून स्पष्ट होण्यास मदत होईल. आर्य-अनार्य संस्कृतीत झालेला संघर्ष, त्यातून जित द्रविड संस्कृतीमधील (अनार्य) मातृदेवतांचे झालेले वैदिकीकरण वा ब्राह्मणीकरण सदरच्या संशोधनातून शोधता येते.

मातृदेवतांचे पूजन जगातील प्रेषितप्रधान धर्मातून नष्ट झालेले आहे. ते फक्त भारतातच आजवर टिकून आहे. भारतातच आजही मातृअधिकार व मातृपूजनाचे अवशेष टिकून आहेत. मातृसत्ताकतेचे भौतिक आचार म्हणजे कृषीप्रधान अर्थव्यवस्था, कुललक्षण पूजावाद, कृषीमाया-यातुविधी, तंत्र संप्रदायातील भौतिकवाद, स्त्रियांनी जपलेली व्रतवैकल्ये, स्त्रीप्रधान सण-उत्सव, यात्रा व नातेदारी इ. होत. भारतीय धर्म व समाजजीवनात ते दिसून येतात, त्याचा शोध घेणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. भारतातील मातृ वा स्त्रीसत्ताक संस्कृती लोकायतिक असुरांची गणराज्यात्मक होती. या लोकायतिकांना म्हणजेच देवी उपासकांना 'बार्ह्स्पत्यमत्', 'सांख्यदर्शनवादी' व 'कापालिक' नावांनी संबोधले गेले. आजही सहजवैष्णव पंथाच्या रूपाने लोकायतिक तत्त्वज्ञान जिवंत आहे. आर्यानींही आपल्या वैदिक वाङ्मयात तंत्रसाधनेला सामावून घेतले होते. अशा लोकायतिकांचा शोध घेणे आवश्यक बनते. नातेदारी व्यवस्था, कुटुंब वा कुलपद्धती, टोटेमवाद यांचा शोध मानववंशशास्त्रदृष्ट्या मानवी जीवन अधिक सुखकर बनण्यास महत्त्वपूर्ण ठरेल.

हिंदू धर्माच्या संक्रमणकाळात हिंदूधर्म व लोकसंस्कृती टिकवून ठेवण्याचे काम अनार्य देवता मानल्या गेलेल्या बहुजनांच्या मातृदेवता–लोकदेवतांनी केलेले आहे. कृषक संस्कृतीमध्ये आजही त्यांना महत्त्वपूर्ण व केंद्रिय स्थान आहे. संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मातृदेवतांचे पूजन मोठ्या प्रमाणावर केले जाते. ग्रामीण समाज व स्त्रिया मातृदेवतांचे नवस–व्रते–यात्रा यामध्ये अधिक गुरफटून गेल्याचे दिसते. अलिकडे तर गावोगावी मातृदेवतांच्या यात्रांना ऊत आला असून हजारो बोकड–कोंबड्या बळी दिले जात आहेत. मातृदेवतांची अनेक मिथके–दंतकथा प्रचलित आहेत. यात्रा–उत्सवांचे धर्म–समाज व अर्थ जीवनावर परिणाम घडून येत आहेत. अंधश्रद्धेत समाज अधिक गुरफटून जात आहे. या संदर्भात संशोधन होऊन संत–समाजसुधारकांच्या विचारधारेचा आधार घेऊन समाज अधिक गतीशिल व विज्ञानवादी बनविण्यास सदरच्या संशोधन कार्याने मदत होईल.

त्याचबरोबर कोल्हापूर जिल्ह्याला इतिहासाचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. प्रागैतिहासिक काळ ते छ. शिवरायांचा उज्ज्वल वारसा, महाराणी ताराबाई ते लोकराजा राजर्षी शाहू असा अमूल्य इतिहास जिल्ह्यास आहे. महाश्मयुगीन शिलावर्तुळे, गुंफा, देवळ्या, तांदळा, प्राचीन मूर्त्या विखरून पडल्या आहेत. त्यांचे संशोधन अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

३) संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study) :–

१) मातृदेवतांचा उगम व स्वरूपाचा शोध जागतिक संदर्भात अभ्यासणे.

२) कोल्हापूर जिल्ह्यातील मातृदेवता व त्यांच्या मंदिरांचा ऐतिहासिक अभ्यास करणे.

३) मातृदेवतांचा लोकजीवन व स्त्रीजीवनावर झालेला परिणाम अभ्यासणे.

४) मातृदेवतांच्या मूलस्वरूपाचा शोध घेऊन कोल्हापूर जिल्ह्यातील मातृदेवतांच्या वास्तव स्वरूपाची मांडणी करणे.

५) मातृदेवतांच्या विषयीचे मिथके, महात्म्ये तपासणे.

६) मातृदेवतांच्या विषयी असणाऱ्या अंधश्रद्धा व त्या विरोधात झालेल्या प्रबोधन चळवळीचा अभ्यास करणे.

७) मातृदेवतांच्या दैवतीकरण व वैदिकीकरणाचा शोध घेणे.

८) मातृसत्ताकतेचे भौतिक आधार कोल्हापूरच्या लोकसंस्कृतीत शोधणे.

४) गृहितके (Hypothesis) :–

१) मातृपूजनाचा आदिबंध प्राचीन काळात संपूर्ण जगभर दिसून येतो.

२) कृषीप्रधान मातृसत्ताक समाजात मातृदेवतांचा उगम व विकास झाला.

३) गणमाता व कुलमुख्यांच्या मृत्योत्तर त्यांचे मातृदेवतांमध्ये रूपांतरण झाले.

४) कोल्हापूर जिल्हा कृषीप्रधान व मातृसत्ताक होता म्हणूनच तेथे मातृदेवतांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे.

५) भूमी व स्त्री या दोघींमध्ये जी सृजनशक्ती, जनन–भरण–पोषण शक्ती आहे, तिच्या प्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्याची रीत म्हणजेही मातृपूजन होय.

५) संशोधन पद्धती (Research Methodology) :–

सदरच्या शोध प्रबंधासाठी 'ऐतिहासिक संशोधन पद्धती'चा वापर करताना प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा वापर करण्यात येईल. संकलित माहितीचे पृथःकरण व अन्वयार्थ लोकसंस्कृतीशास्त्रीय (Ethnography) धर्मशास्त्रीय (Theological), मानवशास्त्रीय (Anthropology), पुरातत्त्वशास्त्रीय (Archeology) व प्राच्यविद्या (Indology) इत्यादीच्या परिप्रेक्ष्यात केला जाईल. संशोधनाच्या गृहितकांना प्रमाण मानून माहितीचे लेखन–पृथःकरण केले जाईल. संशोधनाची उद्दिष्टे वस्तुनिष्ठपणे साध्य करण्याचा प्रयत्न केला जाईल. निष्कर्ष काढत असताना पुन्हा पुन्हा गृहित धरलेल्या सिद्धांताशी पडताळा करण्यात येईल. संशोधन विषयाचे अभ्यासक्षेत्र व मर्यादा ध्यानात घेऊन क्षेत्रसंशोधनावरही भर दिला जाईल. माहिती संकलनासाठी मुलाखत तंत्राचा वापर आवश्यक ठरणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील महत्त्वपूर्ण निवडक मातृदेवतांची निवड संशोधनासाठी केली जाईल. मूलभूत प्रकारच्या या संशोधनामध्ये लिखित, अलिखित, पुरातत्त्वीय संदर्भसाधने, मुलाखत, सूक्ष्म निरीक्षणे व त्यांची टिपणे, शासकीय नोंदी, फोटोग्राफ्स, टेलिव्हिजन, इंटरनेट या साधनांबरोबरच दंतकथा, आख्यायिका, कुळाचार, यातुविधी, म्हणी, गाणी, दैवतकथा, स्थानिक लोकसंस्कृतीचे भौतिक आधार व यात्रा–सण–उत्सव इ. द्वारे संशोधनाला बळकटी दिली जाईल. मातृदेवतांच्या मूर्त्या, तांदळा प्रतिमा, सतीशिळा, गुहा, शिलावर्तुळे, वस्तुसंग्रहालयातील संदर्भ साधनांची पडताळणी गृहितकांशी केली जाईल.

मातृदेवतांच्या संदर्भात जेम्स फ्रेजर, ब्रिफॉ, एरनफेल्स, देवीप्रसाद चट्टोपाध्याय, कॉ. शरद पाटील, सिग्मंड फ्रॉईड, थॉमस, डी. डी. कोसंबी, वि. का. राजवाडे, स. रा. गाडगीळ व श्रीपाद अमृत डांगे यांचे संशोधन व सिद्धांत सदरच्या शोधप्रबंधास उपयुक्त ठरणार आहेत. प्रसिद्ध इतिहासकार डॉ. डी. डी. कोसंबी यांनी पुणे जिल्ह्यातील मातृदेवतांचा अभ्यास केला होता, त्याच आकृतीबंधात कोल्हापूर जिल्ह्यातील मातृदेवतांचा अभ्यास केला जाणार आहे.

६) प्रकरणनिहाय आराखडा :–

प्रास्ताविक :–

यामध्ये विषय निवडीचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, अभ्यास क्षेत्र, माहितीचे संकलन, संदर्भ साधने, माहिती पृथःकरण व एकीकरण, अन्वयार्थ व संशोधन मर्यादा इ. चा समावेश आहे.

प्रकरण १ : कोल्हापूर जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

या प्रकरणामध्ये कोल्हापूर जिल्ह्याचा प्रागैतिहासिक काळ, इतिहासपूर्व काळ, कुर घराण्याची राजवट, सातवाहनकाळ, कोल घराण्याचा इतिहास (मातृसत्ताक), राष्ट्रकुट, शिलाहार, चालुक्य, यादव इ. घराण्याचा कालखंड, तसेच आदिलशाही, मराठा कालखंड, कोल्हापूरचे स्वतंत्र संस्थान, ब्रिटिश कालखंड ते स्वतंत्र भारतात कोल्हापूर संस्थानचे विलिनीकरण असे ऐतिहासिक संशोधन केले जाईल.

प्रकरण २ :मातृदेवतांचा उगम व स्वरूप :-

मातृदेवता या शब्दाचा अर्थ मातृत्व व मातृभाव याचे विवेचन, मातृदेवतांच्या उदयासंबंधीचे विविध विचारप्रवाह व सिद्धांताची चिकित्सा, सामाजिक मानवशास्त्र व मातृसत्ताकता, भूमी आणि स्त्री, कृषीमाया व तंत्रसाधना, मातृदेवतांची ऐतिहासिक मांडणी करताना पुरातत्वशास्त्राचा आधार घेताना जगभरातील प्रागैतिहासिक काळापासूनच्या विविध संस्कृत्यांमधील मातृदेवतांची शिल्पे-मुर्त्यांचा अभ्यास. मातृउपासना पश्चिमेकडून भारतात कशी आली याचा शोध, सिंधूसंस्कृती-जोर्वे संस्कृती-लोहयुगीन संस्कृतीमधील मातृदेवता, मौर्य व सातवाहनकालीन मातृदेवतांचा शोध सदरच्या प्रकरणात घेतला जाईल.

प्रकरण ३ : कोल्हापूर जिल्ह्यातील मातृदेवता :-

या प्रकरणामध्ये पुढील मुद्द्यांच्या संदर्भात संशोधनात्मक मांडणी केली जाईल.कोल्हापूर जिल्हा व सिंधू संस्कृती, कोल्हापूर जिल्ह्यातील कृषीप्रधान मातृसत्ताक संस्कृती, जिल्ह्यातील १२ तालुक्यांमधील मातृदेवतांचे क्षेत्र संशोधनातून मांडणी, मातृदेवतांची मंदिरे, त्यांचे मूलस्वरूप व वास्तवदर्शन, मूर्ती, पूजा-अर्चा व आरती, मंदिराच्या परिसरातील देवदेवता, मंदिर व्यवस्थापन, दंतकथा, रूढी व प्रथा इ. तसेच जिल्ह्यातील मातृदेवतांचे भारतीय पुराणवाङ्मयातील व जागतिक पुरातत्त्वीय संदर्भातून विश्लेषण या प्रकरणामध्ये करता येईल.

प्रकरण ४ : कोल्हापूर जिल्ह्यातील मातृदेवता मंदिराच्या ग्रामयात्रा :-

या प्रकरणामध्ये 'मंदिर' या लोकसंस्कृतीय संस्थेची व्यापक चर्चा करता येईल. मातृदेवतांच्या मंदिरामध्ये भरणाऱ्या यात्रा, यात्रांचे स्वरूप, त्या संदर्भातील दंतकथा, यात्रेतील मानकरी, मंदिराची देवस्थान इनामे, जमिनी, यात्रेतील आर्थिक उलाढाली इ. मुद्द्यांचा अभ्यास करता येईल. त्यातून मंदिर संस्थेचे सांस्कृतिक अर्थशास्त्र समजण्यास मदत होईल.

७) प्रकरण ५ : अंधश्रद्धा आणि प्रबोधन चळवळी:-

कोल्हापूर जिल्ह्याची ओळख देशातील एक पुरोगामी जिल्हा अशी आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील मातृदेवतांचा अभ्यास करताना या मातृदेवतांच्या अनुषंगाने असणारे कुलाचार, लोकधारा, प्रथा, परंपरा, रूढी, गावरहाटी, अंधश्रद्धा, स्त्रियांचे शोषण इ. च्या विरोधात झालेल्या प्रबोधन चळवळीची माहिती व संशोधन या प्रकरणामध्ये मांडता येईल. अंधश्रद्धेच्या विरोधात संतांचे आणि समाजसुधारकांचे प्रबोधन तसेच कोल्हापूरच्या छत्रपती घराण्यातील राजांनी अंधश्रद्धा व कुप्रथेविरोधात काढलेले हुकूमनामे व कायदे, स्वायत्त सामाजिक संस्था व व्यक्तींनी केलेले प्रबोधनाचे कार्य याची मांडणी करता येईल.

प्रकरण ६ : निष्कर्ष

७. संदर्भ साधने :-

१) Beane Wendell Charles, Myth, Cult and Symbols in Sakta Hinduism
२) Ohishi Yoshinori, Feminine Multiplicity; Goddesses in Inda
३) Kali Devadatta, The hidden wisdom of the Goddess
४) Bhattacharyya N. N., Indian Mother Goddesses
५) Veliath Cyril, The Mother Goddesss in Indian Sculpture
६) Sir Frazer James George, The Golden Bough
७) Joshi J. R., Minor Vedic Deities
८) Dikshit S. K., The Mother Goddess
९) अथर्ववेद
१०) हाल, गाथा सप्तशती
११) पाटील शरद, दासशूद्रांची गुलामगिरी
१२) श्री दुर्गासप्तशती
१३) श्री देवीभागवत
१४) प्रभुदेसाई प्रल्हाद कृष्ण, आदिशक्तीचे विश्वस्वरूप अर्थात देवीकोष
१५) साळुंखे नीरज, दैत्यबळी, कुंतल देश महाराष्ट्र
१६) कोसंबी डी. डी., पुराणकथा आणि वास्तवता
१७) कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर
१८) राणा अशोक, 'मातृपूजन : विश्वभजन'
१९) श्री करवीर महात्म्य
२०) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती सर्व्हे रिपोर्ट, १९४५-४६
२१) Graham Report, 1854
२२) दिव्य कुरआन
२३) कॉलिंगवूड आर. जी., कलेची मूलतत्त्वे
२४) डॉ. ढवळीकर म. के., महाराष्ट्राची कुळकथा
२५) ढेरे रा. चिं., लज्जागौरी
२६) डॉ. सौ. लोहिया शैला, भूमी आणि स्त्री
२७) श्री रेणुका महात्म्य

Websites :-

1) www.mothergoddess.com
2) www.goddess.ws
3) www.kolhapur.net
4) www.academia.edu
5) www.cathygarcia.hautefort.com
6) www.metmeseum.org

संशोधक विद्यार्थी ñdmjar
प्रा. श्री. रामचंद्र गुर्लिंग घुले

हडोळती

मार्गदर्शक ñdmjar
प्रा. डॉ. गंगथडे रमेश दत्तात्रय
इतिहास विभाग प्रमुख
कर्मवीर तुळशीराम पवार महाविद्यालय,
ता. अहमदपूर, जि. लातूर